विशेष पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा

दिनांक :-01/11/2025

मिशन परिवर्तन :- **पो.स्टे.जळगांव जा. हद्दीत गांजा बाळगणाऱ्या एकास पकडले., स्थागुशा. कारवाई. 05-किलो 42-ग्रॅम गांजा, मोबाईल असा एकूण किं.1,10,840/-रु.चा मुद्देमाल हस्तगत.**

जिल्ह्यात गांजा व ईतर तत्सम अंमली पदार्थांची वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्या समाज कंटकांचा शोध घेऊन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशीत केले होते. सदर आदेशाप्रमाणे दि.31/10/2025 रोजी पोनि. श्री. सुनिल अंबुलकर-स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा हे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह पो.स्टे. जळगांव जामोद हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना, ग्राम पळशी फाटा या ठिकाणी अवैध गांजाची कारवाई करण्यात आली. विवरण खालील प्रमाणे.

❖ **थोडक्यात हकीकत** :-

दि.31/10/2025 रोजी पोनि. श्री. सुनिल अंबुलकर स्था.गु.शा. बुलढाणा हे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह पो.स्टे. जळगांव जामोद हद्दीत गस्त करीत असतांना, ग्राम पळशी फाटा जवळील हॉटेलजवळ एक ईसम हा संशयास्पदपणे हातात थैली घेऊन जातांना दिसला. सदर व्यक्तीचे वर्तन संशयास्पद असल्याने पोलीस स्टाफने त्यास थांबवून त्याचे जवळील थैलीची झडती घेतली असता, या झडतीमध्ये नमुद व्यक्तीजवळ अवैध गांजा अंमली पदार्थ मिळून आला. प्रकरणी, सदर ईसम हा अवैधपणे ताब्यात गांजा अंमली पदार्थ बाळगून त्याची चोरटी वाहतूक करतांना मिळून आल्याने त्यास मुद्देमालासह ताब्यात घेवून पो.स्टे. जळगांव जामोद यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपी विरुध्द एन.डी.पी.एस. ॲक्टचे कलमांन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास पो.स्टे. जळगांव जा. करीत आहेत. यातील आरोपी व गांजा मुद्देमाल विवरण खालील प्रमाणे.

❖ **आरोपीचे नांव** :-

1) अक्षय तेजराव कोकाटे वय 32 वर्षे रा. पळशी सुपो ता. जळगांव जामोद जि. बुलढाणा **(दि.31/10/2025)**

❖ **आरोपीच्या ताब्यातून हस्तगत मुद्देमाल** :-

गांजा अंमली पदार्थ 05 किलो 42 ग्रॅम किं. 1,00,840/-/-रु. (2) एक मोबाईल किं. 10,000/-रु.

एकूण- 1,10,840/-**रु.चा मुद्देमाल.**

❖ **जिल्ह्यात "मिशन परिवर्तन"**:- मा. पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांचे संकल्पनेतून दि.26/06/2025 पासून संपुर्ण बुलढाणा जिल्ह्यात अंमली पदार्थ विरोधी **"मिशन परिवर्तन"** राबविण्यात येत असून, सदर मिशन अंतर्गत अंमली पदार्थांची वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्या ईसमांचा शोध घेवून त्यांचेवर एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे कठोर कायदेशीर करण्यात येत आहे.

❖ **वरिष्ठ पोलीस अधिकारी मार्गदर्शन व कामगिरी पथक** :- सदरची कार्यवाही मा.श्री. निलेश तांबे- पोलीस अधीक्षक बुलढाणा यांचे आदेशान्वये तर श्री. श्रेणिक लोढा अपर पोलीस अधीक्षक खामगांव, श्री. अमोल गायकवाड-अपर पोलीस अधीक्षक बुलढाणा यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. श्री. सुनिल अंबुलकर स्था.गु.शा. बुलढाणा यांचे प्रत्यक्ष उपस्थितीत पोउपनि. अविनाश जायभाये, पोहेकॉ. दिपक लेकुरवाळे, राजेंद्र टेकाळे, शेख चाँद, गणेश पुरुषोत्तम पाटील, पोकॉ. गजानन गोरले, चापोना. सुरेश भिसे, निवृत्ती पुंड नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा-बुलढाणा, पोहेकॉ.राजु आडवे- तांत्रिक विष्लेषण विभाग बुलढाणा यांचे पथकाने केली.

मा. पोलीस अधीक्षक, बुलढाणा करीता

प्रति,

सर्व पत्रकार बांधव यांना सस्नेह अग्रेषीत.